महिला व बाल कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या मुलामुलींच्या शासकिय संस्थांतील लाभधारकांसाठी तसेच या विभागांतर्गत कार्यरत असलेल्या मतिमंद मुलामुलींच्या शासकिय संस्थांतील लाभधारकांसाठी आहार प्रमाण. ....

20040719153446001-25

महाराष्ट्र शासन

महिला व बाल कल्याण विभाग
शासन निर्णय क्र. मेबंए-१०९४/प्र.क्र.(७७)/का. ३.
नवीन प्रशासन भवन, तिसरा मजला, बी विंग, मुंबई-३२.

दिनांक:- १८ जानेवारी, १९९७.

वाचा: १) शासन निर्णय, शिक्षण विभाग क्र. सी.टी.एन. १०५२,
दि. ३०.९.१९५५.
२) संचालक, महिला व बाल कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे यांचे पत्र क्र. मंबाकसं/शासमुबानृवि/प्रा.सिका/क्र. ७९९/
९१/का. ५३/३६६२/ दि. १६.१२.१९९६.

शासन निर्णय:- महिला व बाल कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या मुलामुलींच्या शासकिय संस्थांतील लाभधारकांना शासन निर्णय, शिक्षण विभाग क्र. सी.टी.एन. १०५२/दि. ३०.९.१९५५ अन्वये ठरवून दिलेल्या आहार प्रमाणाप्रमाणे आहार पुरविण्यात येत होता. या आहार प्रमाणात बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने विचारांती सदर नमूद केलेल्या संस्थांमधील लाभधारकांना या शासन निर्णयासोबत परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केलेल्या प्रमाणानुसार सुधारित आहार प्रमाण व वस्तू पुरविण्यास शासन मान्यता देत आहे.

२. वरील आहार प्रमाण व वस्तू पुरविण्यासाठी कोणताही अतिरिक्त खर्च अपेक्षित राहणार नाही. पूर्वी मंजूर केलेल्या खर्चामधून व मंजूर तरतुदीमधून हा खर्च भागविण्यात यावा. पूर्वी या बाबींवरील खर्च ज्या लेखाशिर्षाखाली खर्ची घालण्यात येत होता, त्याच लेखाशिर्षाखाली [illegible] हा खर्च खर्ची घालण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर-७०/८८५-११/दि. ६. १. ८७ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(उ. शां. भोईटे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. संचालक, महिला व बाल कल्याण संचालनालय, म. रा. पुणे.
२. सर्व विभागीय महिला व बाल कल्याण अधिकारी.
३. सर्व जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी.
४. महालेखापाल १-२ [लेखा परिक्षा][लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. सर्व कोषागार अधिकारी.
८. निवड नस्ती. का. ३.

परिशिष्ट - "अ"

अ.क्र.	खाद्य पदार्थाचे/वस्तूंचे नांव	प्रतिदिन प्रमाण ५ ते १० वयोगटासाठी	प्रतिदिन प्रमाण १० ते १८ वयोगटासाठी	शेरा
१.	गहू, ज्वारी, बाजरी, तांदूळ.	४०० ग्रॅम	४५० ग्रॅम	
२.	डाळी, कडधान्ये	१३० ग्रॅम	१३० ग्रॅम	
३.	पालेभाज्या/फळभाज्या कंदभाज्या.	२५० ग्रॅम	३०० ग्रॅम	
४.	गोडेतेल	४० ग्रॅम	४० ग्रॅम	
५.	दूध/दही	२५० ग्रॅम	३०० ग्रॅम	
६.	शेंगदाणे	१५ ग्रॅम	३० ग्रॅम	
७.	साखर/गुळ	२० ग्रॅम	२० ग्रॅम	
८.	[illegible] तिखट	४० ग्रॅम	४० ग्रॅम	
९.	जळण/इंधन	८०० ग्रॅम	१००० ग्रॅम	
१०.	रवा/पोहे	६० ग्रॅम	६० ग्रॅम	
११.	वनस्पती तूप	१५ ग्रॅम	१५ ग्रॅम	
१२.	चहा पावडर	५ ग्रॅम	५ ग्रॅम	
१३.	कांदे	३० ग्रॅम	३० ग्रॅम	
१४.	ओला मसाला/लसूण/आले कोथंबीर.	१५ ग्रॅम	१५ ग्रॅम	
१५.	मीठ	१० ग्रॅम	२० ग्रॅम	
१६.	मोहरी/जिरे/हळद	५ ग्रॅम	५ ग्रॅम	
१७.	मांस/मटण	१२५ ग्रॅम	१२५ ग्रॅम	आठवड्यातून ३ वेळा.
१८.	खोबरेल तेल	१०० ग्रॅम	१०० ग्रॅम	गरजे प्रमाणे.
१९.	[illegible] साबण	१२५ ग्रॅम [एक वडी]	१२५ ग्रॅम [एक वडी]	महिन्यातून एकदा
२०.	धुण्याचा साबण	१२५ ग्रॅम [४ वड्या]	१२५ ग्रॅम [४ वड्या]	महिन्यातून एकदा.
२१.	फिनाईल	२ लिटर	२ लिटर	२५ प्रवेशितांच्या युनिटकरिता.
२२.	डिटर्जंट पावडर	१०० ग्रॅम	१०० ग्रॅम	महिन्यातून एकदा.

"परिशिष्ट "ब"

परिशिष्ट "अ" मधील आहार प्रमाणा व्यतिरिक्त या विभागांतर्गत कार्यरत असलेल्या मतिमंद मुलामुलींच्या शासकिय संस्थातील लाभधारकांसाठी विशेष आहार प्रमाण.

१] अंडी	रोज एक नग [भटणाचे दिवस ? वगळून]
२] फळे	रोज दोन केळी प्रत्येकी.
	[केळीच्या किंमतीमध्ये ऋतुमानानुसार इतर फळे उपलब्धतेनुसार.]
